# :: प्रेस नोट ::

## आरोपी राजू भुषणवार,लेखाधिकारी, राज्य ग्राहक तक्रार निवारण केंद्र प्रशासकीय इमारत क्र. १ नागपूर यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांना दोन लाखाचा चेक देण्याकरीता आरोपी राजू भुषणवार, लेखाधिकारी, राज्य ग्राहक तक्रार निवारण केंद्र प्रशासकीय इमारत क्र. १ नागपूर यांनी तक्रारदार यांना ५००/—रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूध्द दि. ३०/०४/२०११ रोजी पो.स्टे. सदर नागपूर शहर अप.क्र. ३४१४/११ कलम ७, १३, (१) (ड), सह कलम १३ (२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

मा. श्रीमती सुनिता तिवारी, डीजे — १३, अतिरिक्त सत्र न्यायाधिश नागपूर यांनी न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. १२/६/२०२० रोजी मा. न्यायालयाने आरोपी राजू भुषणवार, लेखाधिकारी, राज्य ग्राहक तक्रार निवारण केंद्र प्रशासकीय इमारत क्र. १ नागपूर यांना कलम ७, १३, (१) (ड), सह कलम १३ (२) लाप्रका मध्ये १ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री विलास देशमुख, तत्कालीन पोलीस उपअधिक्षक, नागपूर, यांनी मुदतीत पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता श्री गीरीश दुबे यांनी काम पाहिले व त्यांना श्री नितीन बलीगवार, पोलीस निरीक्षक, व पोशि पिंपळे, गणवीर, वानखेडे, कैकाडे लाप्रवि. नागपूर यांनी सहाय्य केले.

श्रीमती रश्मि नांदेडकर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

**पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नागपूर**
**दुरध्वनी क्रमांक — ०७१२ —२५६१५२०**
**टोल फ्रि क्रमांक— १०६४**

D.C.P./S.P. Anti Corruption Bureau Nagpur

(गोरख कुंभार)
पोलीस निरीक्षक (वाचक)
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर